# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 257/2023 दिनांक : 02.07.2023**

## 1)दरोडा :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 30.06.2023 रोजी चे 07.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे एमएच–26 बार वाघाळा ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी मिळुन फिर्यादीचे बार मध्ये येवुन बार मधील टेबल खुर्च्या तोडुन काउंटर वरील काच फोडुन एकुण 5000/–रूपयाचे नुकसान करून फिर्यादीस खंजरचा धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीचे बारवर दरोडा टाकुन बारच्या काउंटर मधील नगदी 3000/–रूपये काढुन घेवुन निघुन गेले. वगैरे **फिर्यादी संतोष नारायण गुटटे, वय 36 वर्षे, व्यवसाय बार चालक रा. हाडको नवीन नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 483/2023 कलम 395, 427, भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री पाटील, मो. नं. 9823155291** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 23.06.2023 रोजी चे 00.05 वा. चे सुमारास, **वसमत फाटा शमा इंडेन गॅस गोडाऊन जवळ पुर्णा रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे प्रताप टेक्नोक्राप्ट प्रा. लि. कंपणीमध्ये टेक्नीशियन असुन जीआयडी साईटवरील बीटीसी रँकचे कुलूप तोडुन त्यातील आयडीया कंपणीचे दोन बेसबँड 6630 नंबरे किंमती 60,000/–रू चे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बळीराम शंकरराव साठे, वय 36 वर्षे, व्यवसाय टेक्नीशियन, रा. शनी पार्डी ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 252/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2252 तोडसाम, मो. क्रं. 7720839111** हे करीत आहेत.

## 3)अपघात :–

**कंधार :–** दिनांक 30.06.2023 रोजी चे 21.15 वा. चे सुमारास, **जाबं ते कंधार रोडवर हरबळ ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सत्यवान कोडींबा जोंधळे, वय 23 वर्षे, रा. फरकांडा ता. पालम जि. परभणी** हा फिर्यादी, मयत व ट्रक चालक आरोपी ट्रक क्रमांक एमएच–26/बीई–3265 मध्ये उदगीर येथुन तुर भरून नांदेडकडे येत असतांना यातील आरोपी चालक याने त्याचे ताब्यातील ट्रक हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन पलटी करून अपघात करून त्या ट्रकमध्ये क्लिनर साईडला बसलेला त्याचा भाऊ त्याचे मरणास व फिर्यादीस गंभीर जखमी होणेस व स्वत: चे किरकोळ जखमी होणेस कारणीभुत झाला. व माधव सटवा गडबे यांचे घराचे अंदाजे पन्नास हजार रूपयाचे नुकसान केले व ट्रकचे पाच ते सहा लाख रूपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी भिमराव पि. मोतीराम जोंधळे, व वीस वर्षे व्यवसाय मजुरी रा. फरकंडा ता. पालम जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं. 193/2023 कलम 279, 337, 338, 304(अ), भादवी सह कलम 184 मो वा का कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री लोणीकर, मो.क्र. 9422336474** हे करीत आहेत.

## 4)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**वजिराबाद :–**दिनांक 01.07.2023 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **नसरतपुर पाठीजवळ नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिरित्या स्वताचे फायदयासाठी कत्तल करण्याच्या उद्देशाने एक बैल किंमती 20,000/–रूपयाचा ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1455, मनोज गणपतराव राठोड, ने. पोस्टे वजिराबाद** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद गुरन 252/2023** कलम 5,(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आगलावे, मो. नं. 9890630130** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 01.07.2022 रोजी चे 01.00 वा. चे सुमारास, **साठे चौक नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी हा महाराणा प्रताप चौकाकडुन अणाभाऊ साठे चौकाकडे येणारी कार क्रमांक एमएच–12/बीव्ही–1891 यास नाकाबंदी दरम्यान कार थांबण्यास सांगीतले असता कार थांबवुन मी राष्ट्रवादीचा कार्यकर्ता आहे. माझी गाडी कसे काय थांबवले असे म्हणाल्याने त्याने दारू पिल्याचा वास येत असल्याने त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक धारधार लोखंडी खंजर बाळगलेले मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/शिलराज केशवराव ढवळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 206/2023 कलम 185 (3) मोवाका सह कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2547 वाघमारे, मो.क्र. 9766014795** हे करीत आहेत.

## 6)जुगार :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 01.07.2023 रोजी चे 15.10 वा. चे सुमारास, **बळी इंगेवाड याचे वाघाळा शिवारातील शेतातील लिंबाचे झाडाखाली मोकळया जागेत ता. जि. नांदेड येथे**, यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य असा एकुण 20,010/—रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आले. त्यात आरोपी क्रमांक 3 व 4 विधीसंघर्षीत बालक आहेत. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/492, संतोष रघुनाथ जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 482/2023 कलम 12 (अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो.क्रं. 9511851737** हे करीत आहेत.

**2)मरखेल :—** दिनांक 01.07.2023 रोजी चे 18.10 वा. चे सुमारास, **साईबारच्या पाठीमागे मोकळया जागेत मौ. हानेगाव ता. जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य असा 2450/—रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/चंद्रकांत बाबुराव पांढरे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 137/2023 कलम 12 (अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जायभाये, मो.क्रं. 8975841122** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड